# महाराष्ट्र शासन

क्र.एमव्हीआर-०४२३/प्र.क्र.८८/परि-२
गृह (परिवहन) विभाग, दुसरा मजला,
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु
चौक, मुंबई-४०००३२
दिनांक.१४.०४.२०२३

## आदेश

**मोटार वाहन अधिनियम, १९८८**

**संदर्भ:-** अपर जिल्हा दंडाधिकारी, रायगड-अलिबाग यांचे पत्र क्र.(गृह शाखा) गृह-एमएजी/१/अवजड वाहतुक बंदी आदेश/२०२३ दि.१३.०४.२०२३

ज्याअर्थी, अपर जिल्हा दंडाधिकारी, रायगड-अलिबाग यांनी केलेल्या संदर्भीय अहवालानुसार दिनांक १६.०४.२०२३ रोजी आदरणीय अप्पासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र शासनाकडून महाराष्ट्र भुषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. सदरचा गौरव सोहळा खारघर नवीमुंबई येथे असल्याने सदर कार्यक्रमाकरीता रायगड, रत्नागिरी, ठाणे, मुंबई, पुणे, नाशिक, धुळे, जळगाव, नंदुरबार वगैरे जिल्हातुन तसेच बाहेरील राज्यातुन सुमारे १५ ते २० लाख श्री. सदस्य/अनुयायी खाजगी वाहनांने, एसटी बसेस तसेच रेल्वेने खारघर नवीमुंबई येथे येणार आहेत. सद्यस्थितीत मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६ वर चौपदरीकरणाचे कामकाज चालू असल्यामुळे सदर महामार्गावर बऱ्याच ठिकाणी बोटलनेक पॉईट तयार झालेले आहेत. त्याचप्रमाणे दिनांक १४.०४.२०२३ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त सार्वजनिक सुट्टी असून दिनांक १५.०४.२०२३ व १६.०४.२०२३ रोजी शनिवार व रविवार अशी लगातार ३ दिवस सार्वजनिक सुट्टी असल्याने, नार्गरिक व पर्यटक तसेच श्री.सदस्य/अनुयायी हे मोठया संख्येने आपआपली वाहने घेवून सदर मार्गावरुन प्रवास करणार आहेत. अशा वेळेस सदर मार्गावरुन अवजड वाहतुक सुरु राहील्यास वाहतुक कोंडीचा प्रश्न निर्माण होऊन गंभीर प्रश्न उद्भवू शकतो.

त्याअर्थी, आता, मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ११५ मधील तरतुदींचा वापर करुन महाराष्ट्र शासन या आदेशाद्वारे सार्वजनिक हितास्तव खारघर ते इन्सूली (सांवतवाडी) या राष्ट्रीय महामार्ग क्र. ६६, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग, मुंबई-पुणे जूना राष्ट्रीय महामार्ग तसेच इतर राज्यीय मार्ग वरुन होणारी वाळू/रेती भरलेल्या ट्रक, मोठे ट्रेलर्स तसेच अवजड वाहनांच्या वाहतूकीबाबत पुढीलप्रमाणे आदेश देत आहेत.

दिनांक १४.०४.२०२३ रोजी २४.०० वाजल्यापासून ते दिनांक १६.०४.२०२३ रोजी २४.०० वाजेपर्यंत वरील महामार्ग व इतर राज्य मार्गवर सर्व वाहने ज्यांची वजन क्षमता १६ टन किंवा १६ टनापेक्षा जास्त आहे. (जड-अवजड वाहने, ट्रक, मल्टीएक्सल, ट्रेलर इ. वाहने) अशा सर्व वाहनांची वाहतूक बंद राहील.

वरील निर्बंध दुध, पेट्रॉल-डिझेल, स्वयंपाकाचे गॅस सिलेंडर, लिक्वीड मेडिकल ऑक्सीजन, औषधे व भाजीपाला इ. जीवनावश्यक वस्तू वाहुन नेणाऱ्या वाहनांना लागू होणार नाहीत.

उपरोक्त महामार्ग/राज्य मार्ग च्या रस्तारुंदीकरण, रस्ता दुरुस्ती कामकाज आणि साहित्य माल इत्यादी ने-आण करणाऱ्या वाहनांना बंदी लागू राहणार नाही. तथापि, वाहतूकदारांनी सबंधीत वाहतूक विभाग/महामार्ग पोलीस यांचेकडून प्रवेशपत्र घ्यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(राजेंद्र होळकर)
शासनाचे सह सचिव

प्रति,

१. पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. अपर पोलीस महासंचालक वाहतूक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. विभागीय आयुक्त, कोकण विभाग
४. विभागीय आयुक्त, पुणे विभाग
५. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई